Government of Maharashtra
State Council of Educational Research & Training, Maharashtra
Sadashiv-+Peth, Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020) 24476938, 24475571
Website : www.maa.ac.in

महाराष्ट्र शासन
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र. (०२०)२४४७६९३८, २४४७५५७१
ईमेल: curriculumdept@maa.ac.in

जा.क्र.- राशैसंप्रपम/अविवि / विषय योजना / २०२०-२१ / १८८९ दिनांक: ०७.१०.२०२०.

परिपत्रक

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)

३. शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर/ पश्चिम) बृहन्मुंबई

४. शिक्षण प्रमुख/ शिक्षणाधिकारी /प्रशासनाधिकारी /महानगरपालिका (सर्व)

विषय : इयत्ता अकरावी व बारावी विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९ /प्रक्र (२४३/ १९) एस डी-४, मंत्रालय (विस्तार), मुंबई -३२ , दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९.

२) राज्य मंडळ , पुणे या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./पापु/पापुई /संशोधन/इ.११ वी ची सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना /४२४१,दि.१६/०८/२०१९.

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व सैनिकी शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, इयत्ता अकरावी व व बारावी विषय योजना व मूल्यमापन योजनेची पुनर्रचना संदर्भिय शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेली आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पूर्वीच्या अभ्यासक्रमांमध्ये सामान्य ज्ञान विषयाचा समावेश विषय योजनेमध्ये करण्यात आला होता. प्रामुख्याने सैनिकी शाळांमध्ये हा विषय पर्यायी विषय म्हणून देण्यात आलेला होता. उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता अकरावी व बारावी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजना संदर्भात शासन निर्णयाद्वारे सामान्यज्ञान या विषयास वगळण्यात आले आहे.

संदर्भ क्र.१ शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या विषयरचनेनुसार अंमलबजावणी सुरु असेलच.

संदर्भ क्र. २ परिपत्रकाद्वारे राज्य मंडळाने इ.११ वी व १२ वी साठी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनाबाबत सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे सर्व सूचना पुनःश्च आपल्या अखत्यारीतील सर्व सैनिकी विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(दिनकर पाटील)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे- ३०

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई .
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
५. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे.
६. विशेष कार्य अधिकारी, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय सचिव, सर्व, विभागीय मंडळे, (महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ).